# हेल्मेट वापरा, कुटुंब तुमची वाट पाहतंय : रश्मी शुक्ला

## वाहतूक सप्ताहानिमित्त उद्या दुचाकी रॅलीचे आयोजन

**पुणे, ता. १३ :** "आपण सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित, रस्त्यावर सावधपणे वाहन चालवा. घरी आई-वडील, पत्नी, मुले तुमची वाट बघत असतात. अपघातात बरेवाईट झाल्यास कुटुंबीयांवर संकट ओढवू नये, यासाठी दुचाकीवरून जाताना हेल्मेट परिधान करा," असे आवाहन पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी केले.

शहर पोलिस दलाच्या वतीने ९ ते २३ जानेवारीदरम्यान 'रस्तासुरक्षा अभियान-२०१७' राबविण्यात येत आहे. हेल्मेट जनजागृतीसाठी रविवारी (ता. १५) शिवाजीनगर पोलिस मुख्यालयापासून सकाळी सात वाजता दुचाकी रॅली काढण्यात येणार आहे. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत शुक्ला बोलत होत्या.

सहपोलिस आयुक्त सुनील रामानंद, फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या संचालिका रितू छाब्रिया आणि गल्फ ऑइल लुब्रिकंट्सचे विनायक जोशी या वेळी उपस्थित होते. शुक्ला म्हणाल्या, "वाहतूक नियमांचे पालन करण्याची सुरवात स्वतःपासून होते. तुम्ही तुमच्या कुटुंबावर प्रेम करत असाल, तर वाहतुकीच्या नियमांचे पालन करा." शहर पोलिस दल, फिनोलेक्स आणि गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्स यांच्या वतीने रस्तासुरक्षा सप्ताह राबविण्यात येत आहे. या कंपन्यांकडून पोलिसांना १६५० हेल्मेट्स आणि मास्क वितरित करण्यात येणार आहेत. छाब्रिया म्हणाल्या, "अशा उपक्रमांतून नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता निर्माण होईल. त्यातून नागरिकांच्या समस्या सुटण्यास मदत होईल. नागरिकांनी या रॅलीत सहभागी व्हावे."

जोशी म्हणाले, "देशात सर्वाधिक दुचाकी असलेल्या शहरांमध्ये पुण्याचा दुसरा क्रमांक लागतो. शहरात सेवा क्षेत्र आणि शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणावर असून, नोकरदार, विद्यार्थी प्रवासासाठी दुचाकीला पसंती देतात. त्यामुळे नागरिक म्हणून रस्ते सुरक्षित ठेवण्याची आपली जबाबदारी वाढते."

### 'सकाळ माध्यम समूहा'च्या 'यिन'चाही सहभाग

**या दुचाकी रॅलीत शहर पोलिस दल, फिनोलेक्स पाइप्स आणि गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्सचे कर्मचारी, शहरातील दुचाकीप्रेमी आणि बाइकर ग्रुप्स सहभागी होणार आहेत. तसेच 'सकाळ माध्यम समूहा'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) मधील युवक-युवतींचा सहभाग राहणार आहे.**

### तर पोलिसांवरही कारवाई

वाहतुकीचे नियम न पाळणारे पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. दंडात्मक कारवाईसोबतच त्यांचे नाव पोलिस नोटीसमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल, असा इशारा शुक्ला यांनी दिला.